इमहाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक तक्रार निवारण मंच
कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४९/२०१८-१९/ 45 दिनांक: २८.०२.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ४९(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री अशोक लक्ष्मण निकम<br>मु.पो. म्हैसाळ ता. मिरज<br>जि. सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सांगली ग्रामिण | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग मिरज ग्रामिण | |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.के. ताडे, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

26/2/2019

प्रस्तुतची तक्रार तक्रारदाराने पूर्वलक्षी प्रभावाने लागू केलेल्या विद्युत दर वर्गवारीमुळे वीज देयकातील मागील थकबाकी मागणी संदर्भात दाखल केलेला असून सदरची रक्कम कमी करुन विज बिल दुरुस्त करुन मिळावे अशी मागणी तक्रारदारानी केलेली आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

तक्रारदाराचे थोडक्यात हकीकत अशी की तक्रारदाराने म्हैसाळ ता. मिरज जि. सांगली येथील घर क्र. ३७१६ येथे चालू असलेल्या त्याच्या पोल्ट्री उद्योगाकरिता सिंगल फेज ०.५६ KW इतका वीज पुरवठा रितसर कोटेशन भरुन सन-२००८ साली घेतला आहे. दिनांक २४.०२.२०१८ रोजी त्याच्या सदर उद्योगाकरिता वाढिव वीज भाराची आवश्यकता भासल्याने त्यास थ्री फेज कनेक्शन व दर संकेताक बदलून मिळावा म्हणून लेखी अर्ज शाखा अभियंता म्हैसाळ यांच्याकडे सादर केला त्यावेळी त्यावेळी पोल्ट्री या उद्योगाला लागू पडणारा ८५ LT IV AG. Poultry ऐवजी ८० LT IV AG. Metered दर संकेताक लागू झाल्याचे लक्षात आले. त्यावेळेस शाखा अभियंताशी झालेल्या चर्चेनुसार व दर संकेताक बदलून मिळावा म्हणून लेखी अर्ज सादर केला त्याच दिवशी शाखा अभियंत्यांनी स्थळ पाहाणी करुन आपला अहवाल सादर केला त्यानंतर दिनांक २३.०३.२०१८ रोजी विज दरातील फरकाची रक्कम रु. ६१,१९०/- इतकी मागणी करणारे वीज बिल तक्रारदारास मिळाले. तक्रारदाराच्या कथनानुसार ही थकबाकीची रक्कम चूकीची व अवास्तव आहे. तथापी त्याच काळात वसूलीची मोहिम सुरु असल्याने व त्यामध्ये ते विद्युत कनेक्शन खंडीत केले जावू नये, म्हणून सदर थकबाकी रक्कमेचे हप्ते पाडून दरमहा रक्कम रु. ५,०००/- त्याप्रमाणे हप्ते घेऊन त्याच दिवशी पहिला हप्ता भरलेला आहे. सदरचे बिल चूकीचे व अवास्तव रक्कमेचे बिल असल्याने व दुरुस्त करुन मिळावे अशी तक्रारदाराची मागणी आहे.

पस्तुत प्रकरणाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर विज वितरण कंपनीने कार्यकारी अभियंता सांगली ग्रामिण यांच्या मार्फत हजर होऊन पुढील प्रमाणे आपले लेखी म्हणणे मांडलेले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

१. श्री अशोक लक्ष्मण निकम रा. म्हैसाळ ग्राहक क्र. २७९८५००४१६६५-५ यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी वीज कनेक्शन घेतले आहे.
२. शाखा अभियंता म्हैसाळ यांनी दिनांक २४.०२.२०१८ रोजी दिलेल्या स्थळ तपासणी अहवालानुसार सदर कनेक्शनचा वापर पोल्ट्रीसाठी होत आहे परंतु बिलींग मात्र शेतीपंपा नुसार होत असल्याचे निदर्शनास आले व सदर ग्राहकास कलम १२६ नुसार ६ महिन्याच्या कालावधीतील फरकाचे देयक वसूल होणेबाबत व दर संकेताक कृषी ऐवजी पोल्ट्री प्रमाणे करणेबाबत उपकार्यकारी अभियंता उपविभाग मिरज ग्रामिण एक याना कळविले होते.
३. सदर ग्राहकाने या उपकार्यकारी अभियंता उपविभाग मिरज ग्रामिण एकं या कार्यालयास कनेक्शन घेतेवेळीचा फर्म कोटेशन सादर केले असून त्यामध्ये पोल्ट्री प्रमाणेच कोटेशन काढल्याचे निदर्शनास आले आहे.

CON. REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

२६/१२/१९

४. त्यामुळे सदर ग्राहकास देण्यात आलेले विज देय जावक क्र. ६८३ दिनांक २३.०३.२०१८ नुसार कलम १२६ ऐवजी प्लेन टॅरफि नुसार म्हणजे(ओबीआर सिस्टीम मध्ये मार्च-२०१० पूर्वीचा कालावधी घेता येत नसल्यामुळे) माहे मार्च-२०१० ते सप्टेंबर २०१६ अखेर ग्राहकास शेती पंपानुसार कमी आकाराची देयके देणेत आलेले होते ते पोल्ट्री दर संकेताक प्रमाणे दुरुस्त केले असून माहे मार्च-२०१८ च्या विज देयकात सदर फरकाचे रक्कम रु. ५५,९३०.३१ इतकी चढवण्यात आली आहे. माहे डिसेंबर २०१६ ते डिसेंबर २०१७ अखेर ग्राहकास आर. एन.ए. प्रमाणे बिले गेल्यामुळे त्याचा फक्त स्थीर आकार हा पोल्ट्री प्रमाणे घेऊन ग्राहकास बिल रु. ६१,८९०/- शाखा अभियंता म्हैसाळ यांनी त्यांचे पत्र क्र. ५८९ दिनांक २६.०२.२०१८ नुसार देणेत आलेले आहे.

५. सदर पत्र क्र. ६८३ दिनांक २३.०३.२०१८ नुसार देणेत आलेले फरकाचे बिल रु. ६१,८९०/- हे ग्राहकाने मान्य करुन इतकी मोठी रक्कम एक रक्कमी भरणा करणे शक्य नसल्याने ग्राहकांच्या दिनांक २४.०२.२०१८ व दिनांक २३.०३.२०१८ च्या अर्जानुसार सदर फरकाच्या रक्कमेचे समान १० हप्ते करुन मिळावे ही विनंती ग्राहकाने केली असल्यामुळे त्यास उपकार्यकारी अभियंता यांनी मंजूरी दिली असून त्यातील रु. ५,०००/- ग्राहकाने पावती क्र. ७७७३९३६ ने दिनांक २३.०३.०२०१८ रोजी व रु. ५०००/- पावती क्र. २४३८०५५ दिनांक १४.०७.२०१८ रोजी असे एकूण रु. १०,०००/- चा भरणा केला आहे.

६. माहे डिसेंबर २००८ ते २३.०२.२०१८ अखेर ग्राहकास शेती पंप दर संकेताक नुसार वीज देयक देण्यात आलेली आहेत. परंतु सदरची बिले वीज मागणी अर्जानुसार येत नसून चुकीची येत आहेत त्याबद्दल ग्राहकाने कोणत्याही प्रकारचा दर संकेताक बदलणेबाबतचा अर्ज विज वितरण कंपनीकडे सादर केलेला नाही व संपर्क सुध्दा साधलेला नाही. या वरुन असे निदर्शनास येते की, सदर शेती पंप दर संकेताचा फायदा जाणीव पूर्वक घेतल्याचे दिसून येत आहे.

७. ग्राहकाचा अर्ज दिनांक ०२.०६.२०१८ नुसार ग्राहकाने जावक क्र. ६८३ दिनांक २३.०३.२०१८ नुसार देणेत आलेल्या फरकाचे बिल रु. ६१,८९०/- मान्य नसून माझे वीज मागणी अर्ज व कोटेशन नुसार लोड ०.५६ KW वास्तुविक कनेक्शन सिंगल फेज आहे व फरकाचे बिलामध्ये लोड ५ KW गृहीत धरुन स्थीर आकार जास्त लावले असून ते कमी करुन मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

८. सदर अर्जाची व कागदपत्रांचा विचार करुन या कार्यालयाची मंजूर कार्यालयीन टिपणी द्वारे मंजूर लोड ०.५६ KW प्रमाणे बिल दुरुस्त करुन रु. १०,३७४.७८ इतकी रक्कम ग्राहकाच्या माहे जुलै-२०१८ च्या वीज देयकामध्ये कमी करण्यात आलेली आहे.

९. सदर फरकारची रक्कम रुपये ६१,१९०/- भरणेस मान्य असलेबाबत ग्राहकाने लेखी कळविलेले आहे.

सदर ग्राहकास देणेत आलेले बिल हे मार्च-२०१० ते एप्रिल २०१८ पर्यन्त त्यानी वापर केलेल्या दर संकेताकनुसार (पोल्ट्री प्रमाणे) व प्लेन टॅरिफ फरकानुसारचे बिल असून ते कंपनी नियमाप्रमाणे बरोबर आहे. ग्राहकाने ते भरणे आवश्यक आहे. सदर बाबतीत ग्राहकास वारंवार विज वितरण कंपनीकडून पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे तसेच अंतर्गत तकार निवारण कक्ष मंडल कार्यालय सांगली यांनी भरण्यास मान्य केले असून सुध्दा भरण्यास ग्राहक टाळाटाळ करित असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी ग्राहकास सदरचे फरकाचे रक्कमेचे विज बिल भरण्याचे आदेश देणेत यावेत अशी विनंती विज वितरण कंपनीने केलेली आहे.

28/12/2019

GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज रोजी या मंचासमोर घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारा तर्फे त्याचे प्रतिनिधी त्यांचा मुलगा श्री गणेश निकम व विज वितरण कंपनी तर्फे कार्यकारी अभियंता सांगली ग्रामिण राजू गावडे उपकार्यकारी अभियंता सुधीर केळकर हजर होते.या दोघांचाही युक्तीवाद ऐकून घेतला.

प्रस्तुत प्रकरणी आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपसिथत होतात.

**मुद्दा क्र.१** :- विज दर संकेताकातील बदल या कारणावरुन मागील थकबाकीची मागणी करणारे दिनांक २३.०३.२०१८ चे रक्कम रु. ६१,१९०/- चे देयक कायदेशीर आहे काय?

**उत्तरः-** नाही

**मुद्दा क्र.२** :- अंतिम आदेश खालील प्रामणे

आमच्या वरील निकर्षाची कारणे खालील प्रामणे आहेत.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व२ :-** प्रस्तुत प्रकरणातील सर्वबाबी (Fact) या उभयपक्षी मान्य आहेत. विस्तार भया पोटी त्यांचा पुर्नउच्चार आम्ही या ठिकाणी टाळत आहोत. वास्तविक प्रस्तुत प्रकरण मा. राज्य विज आयोग उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांवरुन, केवळ कायदेशीर मुद्दा वरुन निर्णित केले जावू शकते. दर संकेतांकातील बदलाचा पूर्व लक्षीप्रभावाने अंमल करता येत नाही, ही कायद्याची ठाम बाजू, वर नमूद केलेल्या वरीष्ठ न्यायालयानी वेळोवेळी उद्भूत केलेली आहे. तक्रारदाराची विज पुरवठयाची मुळ मागणी पोल्ट्री व्यवसाया करता होती आणि त्या व्यवसायाकरताच त्याने विज पुरवठा मागतलेला होता, ही बाब विज कंपनी तर्फे या मंचासमोर मान्य करण्यात आली आहे. तसेच मुळ विज पुरवठा सुरु करतेवेळी ८५ LT IV Ag. Poultry ही दर संकेताक वर्गवारी प्रचलित होती , ही बाब देखिल विज वितरण कंपनी तर्फे या मंचासमोर मान्य करण्यात आलेली आहे. त्या दर संकेताक वर्गवारी ऐवजी ८० LT IV AG. Metered ही वर्गवारी लावण्यात आली व ती चूकीची होती ही बाब देखील विज कंपनीने या मंचासमोर स्पष्टपणे मान्य केलेली आहे. दिनांक २४.०३.२०१८ रोजी पर्यन्त त्या चूकीची कल्पना विज वितरण कंपनीला आलेली नव्हती. ही बाब देखील विज वितरण कंपनीने स्पष्टपणे या मंचासमोर मान्य केली आहे . ही चूक विज वितरण कंपनीची आहे त्यास ग्राहक जबाबदार नाही हे देखिल या मंचासमोर विज वितरण कंपनी तर्फे मान्य करण्यात आले. तथापी वीज वितरण कंपनी तर्फे असा ही युक्तीवाद करण्यात आला की दर संकेताक चूकीचा लागला याचा फायदा तक्रारदार ग्राहकाने घेऊन कमी रक्कमेचे बिल भरुन् आपला फायदा करुन घेतला असल्याने, त्यावर थकबाकीची रक्कम भरण्याची जबाबदारी आहे. म्हणून सदर बिलाची थकबाकीची मागणी कायदेशीर आहे. वीज कंपनी तर्फे अशीही मागणी आहे की, तक्रारदाराने सदर थकबाकीची रक्कमेचे हप्ते विज वितरण कंपनी कडून बांधून घेतले असून त्यापैकी रु. १०,०००/- देखील भरलेले आहेत. त्यामुळे त्यास सदर थकबाकी रक्कमेबाबत कोणताही उजर करता येत नाही.

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
महावितरण

२८/१/२०१९

आपल्या झालेल्या चूकीचे खापर वीज वितरण कंपनी ग्राहकावर फोडू शकत नाही. अचूक विज बिल दर संकेताक लावण्याची संपूर्ण जबाबदारी विज वितरण कंपनीवर आहे ,त्या चूकीकरता विज ग्राहक कधीही जबाबदार असू शकत नाही ,त्यामुळे विज कंपनीचे वरील प्रतिपादन मान्य करता येत नाही. विज वितरण कंपनीचे प्रतिपादन कि थकबाकीच्या रक्कमेचे तक्रारदाराने हप्ते पाडून घेऊन पहिला व दुसरा हप्ता देखील भरलेला आहे, म्हणून त्यास आता थकबाकी बाबत कोणताही उजर करता येत नाही, हे देखिल कायद्याने मान्य करता येत नाही. जी मागणी मलूत: बेकायदेशीर आहे. त्या मागणी प्रमाणे काही रक्कम भरली असेल तरी त्यास estoppel by conduct चा बाध येत नाही. हया कायद्याचे ठाम सुत्रानुसार , वीज कंपनीचे दुसरे प्रतिपादन देखील मान्य करता येत नाही वर नमूद केलेल्या कायदयाच्या ठाम सुत्रानुसार दिनांक २३.०२.२०१८ ची विज बिलातील पूर्वलक्षी प्रभावाने काढलेली थकबाकीची रक्कम बेकायदेशीर असून ती मागणी कायदयाने मान्य करता येत नाही . सबब या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे की, मुद्दा क्रमांक एक चे उत्तर नकारार्थी देत प्रस्तुत तक्रार मान्य करावी लागेल. सबब आम्ही खालील प्रमाणे आदेश पारित करिता आहोत.

## आदेश

१) ग्राहकाची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) दिनांक २३.०३.२०१८ चे विज दरातील फरकाची रक्कम रु. ६१,१९०/-ची मागणी करणारे वीज बिल रद्द करण्यात येत आहे व सदर मागणी पोटी तक्रारदाराने भरलेली रक्कम रु. १०,०००/-ही तक्रारदारास पुढील वीज बिलातून परतावा स्वरुपात देण्याचा आदेश विज वितरण कंपनीला देण्यात येत आहे. आदेशाची पूर्तता झाल्याचे विज वितरण कंपनीने या आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या मंचास कळविण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

26/2/19

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

26/02
(एन.के. ताडे)
सदस्य सचिव

26/2/2019
(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

...RESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण